MHYA100016172025

दाखल तारीख :– १५/०९/२०२५
नोंदणी तारीख :– १५/०९/२०२५
निकाल तारीख :– २०/०६/२०२६
कालावधी:–**०० वर्ष ०९ महिने २६ दि.**

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, केळापूर यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी शेख एस.एन.ए.एस)**

**संक्षिप्त फौजदारी ख.क्र. ९३५/२०२५** **निशानी क्र. १२**

**अभियोगपक्ष** :– महाराष्ट्र शासन तर्फे
पोलीस स्टेशन अधिकारी,
पांढरकवडा, ता.केळापूर
जिल्हा यवतमाळ.

**–वि–**

**आरोपी** :– **१. प्रल्हाद विश्वनाथ दंडाजे,**
वय ३८ वर्ष, व्यवसाय – मजुरी,
रा. बोथ,ता. केळापुर, जि. यवतमाळ

**२. धिरज संतोष बुंराडे,**
वय २५ वर्ष, व्यवसाय – मजुरी,
रा. राणा प्रताप वार्ड पांढरकवडा,
ता. केळापुर, जि. यवतमाळ

**महाराष्ट्र जुगारबंदी अधिनियमाचे कलम १२ (अ) सह कलम ४९ भा.न्या.संहिता अंतर्गत खटला**

.................................................................................

**श्री. एस.बी.जगताप, अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता**
**श्री. ए.के. पाटील आरोपींतर्फे वकील**

.................................................................................

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक (Date of Offence) | २९/०७/२०२५ |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक (Date of FIR) | २९/०७/२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक (Date of charge- | १५/०९/२०२५ |

| | |
|---|---|
| sheet) | |
| दोषारोप / प्रतीकथन नोंदविल्याचा दिनांक (Date of framing of Charge) | २९/०४/२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक (Date of Commencement of evidence) | २९/०४/२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक (Date on which judgment is reserved) | २०/०६/२०२६ |
| न्यायनिर्ण दिल्याचा दिनांक (Date of the judgment) | २०/०६/२०२६ |
| शिक्षा दिल्याचा दिनांक (Date of the sentencing Order, if any.) | ........... |

| अ. क्र. ;Rank of the accused) | आरोपीचे नांव (Name of Accused) | अटक केल्याचा दिनांक (Date of Arrest) | जमानतीवर सोडल्याचा दिनांक (Date of Release on Bail) | कलम (Offences charged with) | मुक्तता अथवा शिक्षा (Whether acquitted or convicted) | शिक्षा (Sentence imposed) | न्यायाधीन बंदी असलयाची तारीख कलम ४२८ प्रमाणे (Period of Detention Undergone during Trial for purpose of Section 428 Cr.P.C.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२. | **प्ल्हाद विश्वनाथ दंडाजे,**<br>**धिरज संतोष बुरांडे,** | --- | २९/०४/२०२६ | महाराष्ट्र जुगारबंदी अधिनियमाचे कलम १२(अ) सह कलम ४९ भा. न्या. संहिता | निर्दोष मुक्तता | --- | --- |

**<u>न्यायनिर्णय</u>**

<u>(दिनांक. **२०/०६/२०२६** रोजी घोषीत)</u>

आरोपी क्र. १ प्रल्हाद विश्वनाथ दंडाजे व आरोपी क्र. २ धिरज संतोष बुंराडे, यांच्या विरूध्द महाराष्ट्र जुगारबंदी अधिनियमाचे कलम १२ (अ) सह कलम ४९ भा.न्या.संहिता अंतर्गत खटला पोलीस स्टेशन पांढरकवडा, ता. केळापुर जि. यवतमाळ, तर्फे दाखल करण्यात आला आहे.

२. अपराधाच्या तपशिलानुषंगाने आरोपी विरूध्द ठेवण्यात आलेला आरोप सिध्द करण्याकरीता अभियोगाने जप्तीपंचनाम्या वरील सुभाष विठ्ठल सोयाम यांची साक्ष नोंदविली.

३. आरोपी विरूध्द गुन्हा दर्शविणारा कोणताही पुरावा अभिलेखावर उपलब्ध न झाल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ (१) (ब) अन्वये आरोपीचा बयान नोंदविण्यात आला नाही. खालील मुद्दे न्यायनिर्णयाकरीता माझे विचारार्थ असुन त्यावर मी सकारण निष्कर्ष नोंदविले आहे.

| अ. क्र | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की दिनांक २९/०७/२०२५ रोजी १४.४५ ते १५.१५ वाजता ग्राम बोथ, ता. केळापुर जि. यवतमाळ येथील हनुमान मंदिर जवळ सार्वजनिक जागेवर आरोपी लोकांनकडुन पैसे घेवुन वरली मटका नावाचा हारजीत चा जुगार खेळवितांना मिळुन आला? | ...नकारार्थी |
| २. | अंतिम आदेश? | ...अंतिम आदेशानुसार |

**मुद्दा क्र. १** :—

४. आरोपी विरूध्द असलेला आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे सुभाष विठ्ठल सोयाम यास सरकारी साक्षीदार

क्रं.१ प्रमाणे तपासले. तो अभियोग पक्षाचा जप्ती पंचानाम्यावरील कथित साक्षीदार असुन त्यांनी सरकार पक्षाचे खटल्याचे समर्थन केले नाही. त्यांनी कथित जप्ती पंचनाम्यातील हकीकत निक्षुन नकारलेली आहे. अशा परिस्थितित सरकारी वकीलांनी त्यांची उलट तपासणी घेतली परंतु सरकार पक्षाचे खटल्याचे समर्थन होईल असा पुरावा सरकार पक्ष आणु शकले नाही. सरकारी अभियोक्ता श्री एस. बी. जगताप यांनी अभिलेखानुसार युक्तीवाद केला. आरोपीचे वकील श्री. ए.के. पाटील यांनी आरोपी विरूध्द काहीही निष्पन्न होत नसल्याचा युक्तीवाद केला.

५. सदर युक्तीवादाच्या अनुषंगाने तसेच वर नमुद साक्षीदाराची साक्ष विचारात घेता असे निदर्शनास येते की साक्षीदार क्र. १ सुभाष विठ्ठल सोयाम यांनी जप्ती पंचनामा या वरील दिनांक २९/०७/२०२५ रोजी केलेली सही वगळता इतर कुठलाही मजकुर सिध्द केलेला नाही. त्यामुळे जप्ती पंचनामा सिध्द झाला असे म्हणता येणार नाही. त्याचप्रमाणे अभियोग पक्षाने साक्षीदाराच्या सरतपासातही अभिलेखावर आरोपी विरूध्द गुन्हा साबीत होईल असे काहीही आणले नाही.

६. सदर प्रकरणात साक्षिदारांची साक्ष विचारात घेतली असता अभिलेखावर दाखल केलेले दस्ताऐवज सिध्द झाले नाही. अभियोग पक्षाने सदर आरोपी हाकथित घटनेच्या वेळी बोथ येथील हनुमान मंदिर जवळ सार्वजनिक जागेवर आरोपी क्र. १ प्रल्हाद विश्वनाथ दंडाजे यांचे लोकांनकडुन पैसे घेवुन वरली मटका नावाचा हारजीत चा जुगार खेळवितांना आढळला व त्यांची अंगझडती घेतली असता वरली मटका लिहलेले चिट्टया, कार्बन चा तुकडा, निळया शाईचा पेन व आरोपी जवळ एकुण नगदी १,१००/— रु. व एक पोको कंपनीचा मोबाईल किंमत अंदाजे ४,०००/— रुपये असा एकुण नगदी ५,१००/— मुद्देमाल जप्त करण्यात आला या बाबत कुठलाही पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. त्यामुळे मी अशा निष्कर्षावर आले आहे की अभियोग पक्ष आरोपींवरील दोषारोप सिध्द करू शकले नाही. म्हणुन मी मुददा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देते.

**मुद्दा क्र.२ :—**

७. मुददा क्र. १ च्या नकारार्थी उत्तरामुळे आरोपी हे दोषमुक्त करण्यास पा्त्र आहे. जप्त मालमत्ते वर आरोपी कोणीही आपला दावा केलेला नाही जप्त करण्यात आलेली वरली मटका चिठ्ठया, कार्बन, बॉलपेन पेन इत्यादी साहित्य हे निरूपयोगी असल्याने नाश करण्यात यावी व नगदी दोन्ही मिळुन १,१००/— रूपये सरकार खाती वर्ग करणे योग्य होईल म्हणुन मी मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करते.

## आदेश

१) **आरोपी क्र. १ प्रल्हाद विश्वनाथ दंडाजे व आरोपी क्र.२ धिरज संतोष बुंराडे,** यांना फौजदारी व्यवहार संहितेच्या कलम २५५(१)अन्वये मुंबई जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) सह कलम ४९ भा.न्या.संहिता नुसार शिक्षेस पा्त्र असलेल्या गुन्हा केल्याच्या आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२) फौजदारी प्रकिया संहितेचे कलम ४३७—अ प्रमाणे आरोपी यांचे बंधपत्र व जामीनपत्र सहा महिण्यासाठी कायम ठेवण्यात येते.

३) या प्रकरणातील मुददेमाल म्हणजे एक बॉलपेन पेन व वरली मटका साहित्य हे निरूपयोगी असल्याने नाश करण्यात यावे व नगदी १,१००/—रु. अपील कालावधी संपल्यानंतर सरकार खात्यात जमा करण्यात यावे. तसेच गुन्हयामध्ये जप्त असलेला एक मोबाईल मुळ मालकास मालकी हक्काचे कागदपत्रांची पडताळणी करुन अपील कालावधी संपल्यानंतर परत करावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषीत)**

स्वा/—
(शेख एस.एन.ए.एस)
दिनांक: **२०.०६.२०२६** **२ रे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**केळापुर — कोर्ट नं. २**